**नि.फौ.ख.क्र.१४/२०२२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**

**निशाणी क्र.**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – दुर्गास बापु साळेकर

**वय** – ५२ वर्षे, **धंदा** – शेती

**राहणार** – महामुलकरवाडी, ता.जावली, जि.सातारा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे यांचेमार्फत सुरु</u>**

१. मी राहण्यास सातारा येथे आहे परंतू, माझी शेती महामुलकरवाडी येथे आहे. मी महामुलकरवाडी येथे शेतीसाठी रोज येवून जावून असतो. अनिल दगडू साळेकर हे गावात राहण्यास आहे. त्यांच्या पत्नीचे नाव आशा अनिल साळेकर आहे. त्यांचा शेती व मेसचा व्यवसाय होता. छाबडा शाळेतील मुलांना त्यांची मेस होती. रुपाली महामुलकर कोण आहेत ते मला माहित नाही. १७.०३.२०२२ रोजी काय घडले ते मला माहित नाही, मी शेतामध्ये होतो. अनिल साळेकर यांना कोणी कशाने मारहाण केली ते मला माहित नाही. त्यांची पत्नी आशा अनिल साळेकर यांना कोणी मारहाण व दमदाटी केली हे मला माहित नाही.

***साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे तसेच पूर्वीचे जबाबाशी विसंगत जबाब देत असल्यामुळे सरकारी अभियोक्त्याने भारतीय पुरावा अधिनियम कलम १५४ प्रमाणे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सदरील परवानगी देण्यात आली.***

२. जालिंदर साळेकर हे गावातील आहेत, त्यांना मी ओळखतो. आरोपी हे आमच्या गावातील असल्यामुळे आमचे व त्यांचे बोलणे आहे. माझे संबंध गावातील सगळयांशी चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी जालिंदर साळेकर यांचा सख्खा चुलत भाऊ आहे. रुपाली महामुलकर या आशा साळेकर यांच्या नातेवाईक आहेत का ते मला माहित नाही. रुपाली गणेश महामुलकर यांचे घर महामुलकरवाडी येथे आहे.

सदर रुपाली महामुलकर या मुंबईला राहण्यास असतात. रुपाली महामुलकर व आशा साळेकर यांच्या घरामध्ये एक ते दोन घरांचे अंतर असेल. रुपाली महामुलकर गावी राहण्यास नसल्यामुळे त्यांचे घर भाडयाने देत होते का ते मला माहित नाही. त्या घराची चावी आशा साळेकर यांच्याकडे असते याबाबत मला माहिती नाही. दुपारी ०३:०० वाजताच्या दरम्यान आशा साळेकर, अविनाश पावणे हे रुपाली महामुलकर यांच्या घराचा कडी कोयंडा कोणी काढला याबाबत चर्चा करत होते याबाबत मला माहिती नाही. त्यावेळी जालिंदर साळेकर तेथे आले होते याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी अनिल साळेकर हे जालिंदर साळेकर यांना म्हणाले की, आण्णाच्या घराचा कोयंडा तूच काढलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासमक्ष जालिंदर साळेकर यांनी अनिल साळेकर याला वांझोटया असे म्हणून शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष जालिंदर साळेकर यांनी अनिल साळेकर यांना ढकलून दिल्यामुळे ते खाली पडले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष जालिंदर साळेकर हे अनिल साळेकर यांच्या पोटावर बसून उजव्या हाताच्या दंडावर, पोटरीवर व पोटावर चावा घेतला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष त्यावेळी आशा साळेकर भांडण सोडवायला आल्या असता त्यांनादेखील हाताने मारहाण करुन जालिंदर साळेकरने त्यांना ढकलले. मी रानात असल्यामुळे जालिंदर साळेकर यांचे वडील संभाजी साळेकर यांनी अनिल साळेकर यांना काठीने मारहाण केली याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी, सुशिला साळेकर, अविनाश पावणे यांनी सदरची भांडणे सोडवली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी व आशा साळेकर यांनी अनिल साळेकर यांना घरी घेवून गेलो, त्यांचा शर्ट काढला व चावल्याचे डाग पाहिले. हे म्हणणे खरे नाही की, चावल्यामुळे तिथून रक्त आले होते हे मी पाहिले होते. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता, तो माझ्या जबाबात का नमूद केला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष अनिल साळेकर, आशा साळेकर यांना आरोपी यांचेकडून मारहाण व शिवीगाळ केल्याची घटना घडली त्यामुळे मी ती घटना पोलीसांना जबाब देताना सांगितली होती. हे म्हणणे

खरे नाही की, मी ती घटना पोलीसांना सांगितल्यामुळे माझ्या जबाबात ती घटना नमूद आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, महामुलकरवाडी येथे दोन राजकीय गट आहेत. आरोपी व फिर्यादी हे दोन वेगवेगळया राजकीय गटांमध्ये काम करतात ते मला माहित नाही. मी गेले ३–४ वर्षे राजकारणात नाही, त्यामुळे माझा व आरोपींचा राजकीय गट एक नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे व गावातील असल्यामुळे त्यांना शिक्षा होवू नये असे वाटते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे नातलग असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.जी.एम.फरांदे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

ठिकाण : मेढा
रविंद्र भ. खवले,

दि.०९.०१.२०२४
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**